# बाबा मुक्तानंदांचे दर्शन आणि त्यांचे प्रज्ञान

१. आपल्या आत्मस्वरूपाचे ध्यान करा.
आपल्या आत्मस्वरूपाचा सन्मान करा.
आपल्या आत्मस्वरूपाला समजून घ्या.
तुमचा राम तुमच्या अंतरी तुमच्याच स्वरूपात वास करतो.

~ बाबा मुक्तानंद

स्वामी मुक्तानंद, *ध्यान सोपान*, पृ. ३९.
© २०१२ चित्‌शक्ती पब्लिकेशन्स®. सर्वाधिकार सुरक्षित.

हे छायाचित्र सिद्धयोग बुकस्टोअरमध्ये उपलब्ध आहे.

२. "सद्‌गुरुनाथ महाराज की जय!" अत्यंत प्रेमाने आणि अत्यंत सन्मानाने आपल्या सर्वांचे हार्दिक स्वागत. सन्मानाने दुसऱ्या व्यक्तीचे स्वागत करणे, ही खरी मानवता आहे. हेच ज्ञान आहे. मनुष्याला जेव्हा स्वतःच्या अंतरी परमेश्वराचे दर्शन होते, तेव्हा त्याला इतरांमध्येही परमेश्वर दिसू लागतो.

~ बाबा मुक्तानंद

स्वामी मुक्तानंद, *Gurudev Siddha Peeth Newsletter*, जुलै १९७९, पृ. ७.
© १९७९ गुरुदेव सिद्धपीठ®. सर्वाधिकार सुरक्षित.

३. गुरू, मंत्रस्वरूपात सदैव तुमच्या हृदयात वास करतात. त्यांना तिथेच पाहा—त्यांच्या संपर्कात राहण्याचा सर्वात उत्कृष्ट मार्ग तोच आहे.

~ बाबा मुक्तानंद

स्वामी मुक्तानंद, *From the Finite to the Infinite*, पृ. ६३.
© १९९४ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.

४. माझे गुरुदेव म्हणत, “देव एकच आहे आणि तो प्रेमस्वरूप आहे.” म्हणून, पूर्ण हृदयाने दुसऱ्यांचे स्वागत कसे करावे हे तुम्ही शिकले पाहिजे. हाच सर्वोच्च धर्म आहे.

~ बाबा मुक्तानंद

स्वामी मुक्तानंद, *गणेशपुरी निवासी भगवान नित्यानंद,* पृ. १५९.
© २०१२ चित्‌शक्ती पब्लिकेशन्स®. सर्वाधिकार सुरक्षित.

५. तुम्हाला जेव्हा ‘त्याला’ प्राप्त करण्याची तीव्र उत्कंठा असते, तुम्हाला जेव्हा ते परमसत्य प्राप्त करण्याची तृष्णा असते, तेव्हा तुमच्या स्वतःच्याच हृदयात ते परमसत्य स्वतःला प्रकट करते. असे कोणते स्थान आहे जिथे आत्मा नाही? असा कोण आहे ज्याच्यामध्ये हा आत्मा नाही?

~ बाबा मुक्तानंद

स्वामी मुक्तानंद, *I Have Become Alive,* पृ. ३३.
© १९९२ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.

६. जसजसा मंत्र तुमच्या अंतरी अधिकाधिक स्पंदित होऊ लागतो, तसतसे मंत्राचे लक्ष्य—जे शुद्ध प्रेम आहे—हृदयात प्रवाहित होऊ लागते.

~ बाबा मुक्तानंद

स्वामी मुक्तानंद, *From the Finite to the Infinite,* पृ. १६६.
© १९९४ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.

हे छायाचित्र सिद्धयोग बुकस्टोअरमध्ये उपलब्ध आहे.

७. आपण परमेश्वराला प्राप्त करण्यासाठी ध्यान करीत नाही, तर त्या परमेश्वराच्या दर्शनासाठी ध्यान करतो जो आधीच प्राप्त आहे.

~ बाबा मुक्तानंद

स्वामी मुक्तानंद, *The Self is Already Attained,* पृ. १.
© १९९३ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.

८. साधनेकरिता तुम्हाला जर कशाची आवश्यकता आहे, तर ती म्हणजे दृढ, प्रामाणिक प्रयत्न. आणि तुम्ही जर तो दृढ, प्रामाणिक प्रयत्न केला, तर तुम्ही कुठेही असलात तरी तुमची साधना चांगल्या रीतीने होत राहील. त्याकरिता तुम्हाला एखाद्या आश्रमात राहण्याची आवश्यकता नाही. साधनेकरिता तुमच्यामध्ये जे असणे आवश्यक आहे, ते म्हणजे आत्मसाक्षात्काराची प्रचंड तळमळ आणि ती जर तुमच्यामध्ये असेल, तर तुम्ही कुठेही साधना करू शकता.

~ बाबा मुक्तानंद

स्वामी मुक्तानंद, *प्रशांतीने स्पंदित,* १२ जून.

© २०१४ चित्शक्ती पब्लिकेशन्स®. सर्वाधिकार सुरक्षित.

९. चितीमध्येच आपले अस्तित्व आहे आणि आपण परत तिच्यामध्येच विलीन होतो. आपण ती चिती आहोत. ह्यालाच साधना म्हणतात.

~ बाबा मुक्तानंद

स्वामी मुक्तानंद, *प्रशांतीने स्पंदित,* २५ जून.

© २०१४ चित्शक्ती पब्लिकेशन्स®. सर्वाधिकार सुरक्षित.

१०. नामसंकीर्तन एक अत्यंत महान साधना आहे. त्याचा प्रभाव रक्तावर पडतो आणि रक्ताच्या माध्यमातून शरीराच्या इतर सर्व धातूंवर त्याचा प्रभाव पडतो. महान सिद्धजन, आत्मसाक्षात्कारानंतरही आनंदमय नामसंकीर्तन करत राहतात. तुम्ही जर प्रेमाने नामसंकीर्तन केले, तर ते ‘नाम’ तुम्हाला त्याच्या अर्थापर्यंत घेऊन जाते.

~ बाबा मुक्तानंद

स्वामी मुक्तानंद, *Shree Gurudev Ashram Newsletter,* जानेवारी १९७४, पृ. १०.

© १९७४ श्रीगुरुदेव आश्रम®. सर्वाधिकार सुरक्षित.

११. जी शक्ती तुमच्या अंतरात जागृत होऊन अंतरी क्रियाशील होते, तीच खरी गुरू आहे. असा विचार करू नका की, गुरू, शक्ती आणि मंत्र हे एकमेकांपासून भिन्न आहेत. ते एकच आहेत. तुमच्या अंतरी गुरूंचा वास आहे अशी जाणीव ठेऊन चिकाटीने, दृढतेने व प्रेमाने ध्यान करा.

~ बाबा मुक्तानंद

स्वामी मुक्तानंद, *American Tour* १९७०, पृ. ३२.
© १९७४ स्वामी मुक्तानंद ®. सर्वाधिकार सुरक्षित.

१२. ह्या योगामध्ये नामसंकीर्तनाची भूमिका सर्वोच्च आहे; ते एक चुंबक आहे जे परमेश्वराच्या शक्तीला खेचून घेते. नामसंकीर्तनाने ध्यान सहज-सुलभ बनते. अंतःस्थ कुंडलिनी शक्ती नामसंकीर्तनाने अतिशय प्रसन्न होते. ते किती प्रभावशाली आहे, हे जाणण्यासाठी, तुम्ही नामसंकीर्तन केले पाहिजे.

~ बाबा मुक्तानंद

स्वामी मुक्तानंद, *From the Finite to the Infinite,* पृ. १४४.
© १९९४ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.

१३. आज प्रेमाचा दिवस आहे, म्हणून मी तुम्हा सर्वांचे अत्यंत प्रेमाने स्वागत करतो, कारण सर्वांवर प्रेम करणे ही माझी पूजा आहे. माझ्याकडे पूजेचे अन्य कुठलेही साधन नाही. मी तुमच्यावर प्रेम करतो.

~ बाबा मुक्तानंद

स्वामी मुक्तानंद, *Shree Gurudev Ashram Newsletter*, एप्रिल १९७६, पृ. ५.
© १९७६ श्रीगुरुदेव आश्रम®. सर्वाधिकार सुरक्षित.

१४. ज्यांनी स्वतःमध्ये जगत आणि जगतामध्ये स्वतःला पाहिले आणि चराचर जगतामध्ये तो 'एक' पाहिला; मुक्तानंद! तेच एक सिद्ध आहेत.

~ बाबा मुक्तानंद

स्वामी मुक्तानंद, *मुक्तेश्वरी,* पृ. २८४.
© २०१४ चित्शक्ती पब्लिकेशन्स®. सर्वाधिकार सुरक्षित.

१५. जर तुमच्यामध्ये गुरूंप्रति पूर्ण भक्ती, आदर आणि प्रेम असेल, तर यात यत्किंचितही शंका नाही की, तुम्हाला ते सर्वकाही प्राप्त होईल, जे गुरूंकडे आहे आणि ते त्यांना तुम्हाला द्यायचे आहे.

~ बाबा मुक्तानंद

स्वामी मुक्तानंद, *Selected Essays*, पृ. ५१.
© १९९५ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.

१६. गुरू करुणामय आहेत; म्हणून, जर तुम्ही स्वतःला त्यांच्यात निमग्न केले, तर तुम्हीदेखील करुणेने भरून जाल. प्रेमाने आणि या भावनेने स्वतःला त्यांच्यात लीन करा की, ते तुमचेच आहेत.

~ बाबा मुक्तानंद

स्वामी मुक्तानंद, *The Perfect Relationship*, पृ. ४७.
© १९९९ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.

१७. तुम्ही ध्यानात ज्याला पाहता व अनुभवता आणि ज्याला हा बोध असतो की, ध्यानात तुमच्यासोबत काय घडते आहे, तो तुम्हीच आहात. जे नित्य विद्यमान आहे, ते शोधण्याचा प्रश्न येतोच कुठे?

~ बाबा मुक्तानंद

स्वामी मुक्तानंद, *Satsang with Baba*, भाग ५, पृ. १७९.
© १९७८ गुरुदेव सिद्धपीठ®. सर्वाधिकार सुरक्षित.

१८. आंतरिक जगत महान आहे, ते विशाल आहे, ते दिव्य आहे—आणि ध्यानाद्वारे त्या जगताचे ज्ञान होते.

~ बाबा मुक्तानंद

स्वामी मुक्तानंद, *From the Finite to the Infinite*, पृ. २६.
© १९९४ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.

१९. अभिनवगुप्त यांच्या 'तन्त्रालोक'मध्ये स्पष्ट केले आहे की, सर्वकाही शिव आहे. म्हणून, या बोधाचा अभ्यास केल्याने समदृष्टीचा उदय होणे अतिशय स्वाभाविक आहे. वस्तुतः सर्वकाही जर शिवच आहे, तर प्रत्येक गोष्ट शिवरूपात पाहणे इतके कठीण आहे का? आपल्याला स्वतःचा सामान्य व सवयीचा दृष्टिकोण बदलायला हवा. तेव्हाच आपण सुखी होऊ.

~ बाबा मुक्तानंद

स्वामी मुक्तानंद, *Secret of the Siddhas*, पृ. २०२.
© १९९४ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.

२०. वेदान्तामध्ये एक प्रश्न आहे : "मनुष्याला वेदान्ताची आवश्यकता का आहे? मनुष्याने वेदान्ताचा उपयोग कसा करावा?" जे उत्तर दिले गेले आहे, ते असे आहे : "मी वेदान्ताचे अध्ययन करतो, जेणेकरून माझ्या सर्व दुःखांपासून आणि क्लेशांपासून माझी सुटका व्हावी आणि मला स्वतःच्या अंतरी स्वयंस्फूर्त परमानंदाची प्राप्ती व्हावी." आपण ज्ञानार्जन करतो, जेणेकरून आपण स्वतःमध्ये तृप्त व्हावे, जेणेकरून आपण मुक्त व्हावे आणि शांती अनुभवावी.

~ बाबा मुक्तानंद

स्वामी मुक्तानंद, *Shree Gurudev Ashram Newsletter*, सप्टेंबर १९७८, पृ. ९-१०.
© १९७८ गुरुदेव सिद्धपीठ®. सर्वाधिकार सुरक्षित.

हे छायाचित्र सिद्धयोग बुकस्टोअरमध्ये उपलब्ध आहे.

२१. मी या विश्वाला संतांनी भरलेले पाहू इच्छितो. मी सर्वांना सुखी पाहू इच्छितो. प्रत्येकाने सतत आनंदात राहावे आणि त्याला स्वप्नातदेखील दुःख होऊ नये. परमात्म्याकडे हीच माझी अंतिम इच्छा आहे.

~ बाबा मुक्तानंद

स्वामी मुक्तानंद, *In the Company of a Siddha*, सुधारित आवृत्ती, पृ. ३६.
© १९८५ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.

२२. ज्या क्षणी तुम्हाला स्वतःच्या अंतरी परमात्म्याचा बोध होतो, त्या क्षणी तुम्हाला हे संपूर्ण जगत स्वर्गासमान दिसू लागते.

~ बाबा मुक्तानंद

स्वामी मुक्तानंद, *From the Finite to the Infinite,* पृ. ४७१.
© १९९४ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.

२३. गुरुकृपा, शक्तिपात म्हणूनही ओळखली जाते जी केवळ सिद्धगुरूच प्रदान करू शकतात. साधकाला दिव्यत्वाची अनुभूती प्रदान करण्याचे सामर्थ्य त्यांच्यात असते. हे अगदी खरे आहे की, जोपर्यंत एका पूर्णतः सामर्थ्यशाली सद्गुरूंच्या कृपेद्वारे शक्तिपात प्राप्त होत नाही, तोपर्यंत एका व्यक्तीला पूर्ण आंतरिक शांती मिळणे अशक्य आहे.

~ बाबा मुक्तानंद

स्वामी मुक्तानंद, *Bhagawan Nityananda: His Life and Mission,* द्वितीय आवृत्ती, पृ. ५५.
© १९७४ गुरुदेव सिद्धपीठ®. सर्वाधिकार सुरक्षित.

२४. गुरू देतात तेव्हा घेणे, गुरू घेतात तेव्हा देणे, गुरूंचेच होऊन राहणे, मुक्तानंद! ही गुरुभक्तीची लक्षणे आहेत.

~ बाबा मुक्तानंद

स्वामी मुक्तानंद, *मुक्तेश्वरी,* पृ. १९४.
© २०१४ चित्शक्ती पब्लिकेशन्स®. सर्वाधिकार सुरक्षित.

२५. हे सर्वथा निश्चित आहे की, आत्मा आनंदपूर्ण आहे . . . एकदा अंतर्मुखी होऊन तो आनंद प्राप्त केल्यानंतर, मनुष्य जेव्हा पुन्हा बहिर्मुखी होतो, तेव्हा त्याला सर्वांमध्ये त्याच आनंदाची अनुभूती होते. जेव्हा तो मनुष्य या बोधासह लोकांना पाहतो की, तेदेखील आनंदाने व्याप्त आहेत, तेव्हा त्याला समाधी-सुख प्राप्त होते.

~ बाबा मुक्तानंद

स्वामी मुक्तानंद, *From the Finite to the Infinite,* पृ. ५२९.
© १९९४ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.

२६. हृदयी किती खूश आहे मी. किती हसतो, नाचतो, बागडतो, परा-आनंदमस्तीमध्ये पूर्ण मस्त असतो. मुक्तानंद! जेव्हा हृदयी नित्यानंद प्रकट झाले, तेव्हा अशी गती मिळाली.

~ बाबा मुक्तानंद

स्वामी मुक्तानंद, *मुक्तेश्वरी,* पृ. ३०४.
© २०१४ चित्‌शक्ती पब्लिकेशन्स®. सर्वाधिकार सुरक्षित.

२७. तुम्ही आपल्या मनाला, “शिवोऽहम्,” “मी शिव आहे” आणि “सोऽहम्,” “मी ‘तो’ आहे” याच विचारात तल्लीन ठेवले पाहिजे. तुम्ही ही समज बाळगली पाहिजे : “जो ध्यान करतो आहे, तो ईश्वरच आहे. मी ज्या-ज्या वस्तूंवर ध्यान करतो, त्या सर्व ईश्वरच आहेत. माझे ध्यानच ईश्वर आहे.” जेव्हा तुम्हाला हा बोध असतो, तेव्हा तुम्ही कुठेही, केव्हाही आपली साधना करू शकता.

~ बाबा मुक्तानंद

स्वामी मुक्तानंद, *सत्याच्या वाटेवर,* पृ. १३१.
© २०११ चित्‌शक्ती पब्लिकेशन्स®. सर्वाधिकार सुरक्षित.

२८. शैवमतानुसार, साधकाला जेव्हा कुंडलिनीचे बल प्राप्त होते, तेव्हा तो असीमितपणे विस्तृत होऊन या संपूर्ण विश्वाला स्वतःमध्ये आत्मसात करतो. तो संपूर्ण विश्वाला स्वतःच्या आत्म्यात पाहू शकतो. . . . तो शिवात विलीन होऊन शिवच बनतो.

~ बाबा मुक्तानंद

स्वामी मुक्तानंद, *कुंडलिनी : जीवनाचे रहस्य,* पृ. ८.
© २०१२ चित्‌शक्ती पब्लिकेशन्स®. सर्वाधिकार सुरक्षित.

२९. सिद्ध ते आहेत, जे मुक्तीयोगाच्या अभ्यासाद्वारे परम मुक्तीच्या उच्च स्थितीला पोहोचून शाश्वतरूपाने त्या स्थितीत अवस्थित होतात.

~ बाबा मुक्तानंद

स्वामी मुक्तानंद, *Satsang with Baba,* भाग ३, पृ. १९५.
© १९७७ श्रीगुरुदेव आश्रम®. सर्वाधिकार सुरक्षित.

३०. गुरुसेवा अनमोल आहे. ती अमूल्य आहे. तुम्ही अन्य कोणत्याही गोष्टीचे मूल्य ठरवू शकता, पण गुरुसेवेचे मूल्य तुम्ही ठरवू शकत नाही. गुरुसेवा केल्यानंतरच, गुरूंना सेवा अर्पण केल्यानंतरच तुम्हाला हा बोध होतो आणि याची प्राप्ती होते.

~ बाबा मुक्तानंद

स्वामी मुक्तानंद, *From the Finite to the Infinite*, पृ. २०५.
© १९९४ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.

३१. आपली दृष्टी बदला. ध्यानात अधिकाधिक खोलवर जाऊन त्या स्थानी पोहोचा जिथे असामान्य परमानंदाची स्थिती तुमची प्रतीक्षा करते आहे. जेव्हा तुम्ही त्या स्थितीपर्यंत पोहोचाल, तेव्हा तुम्ही ती स्थितीच बनाल. तुम्ही हे जाणाल, “मी ‘तो’ आहे,” “सोऽहम्.”

~ बाबा मुक्तानंद

स्वामी मुक्तानंद, *Everything Happens for the Best*, पृ. ३१.
© १९९४ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.

© २०२२ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.